**आकाशवाणी मुंबई**

**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

**<u>ठळक बातम्या</u>**

- धर्मस्वातंत्र्य विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही तर बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यात सर्व खासगी रुग्णालयं आणि नर्सिंग होम्सचा आढावा घेण्यासाठी सरकार समिती स्थापन करणार

- सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या १८ जणांना आतापर्यंत राज्यात अटक, बाराशेहून अधिक सिलिंडर जप्त

**आणि**

- ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक हे कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज विधानसभेत धर्मस्वातंत्र्य विधेयकावर चर्चेला सुरुवात करताना बोलत होते. या विधेयकानुसार बेकायदेशीर धर्मांतरासाठी केलेला विवाह रद्द केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड - मुख्यमंत्री - - -**

कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला धर्मांतर करण्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यानंतर संबंधित प्राधिकरण हे अशा पद्धतीचं धर्मांतर योग्य आणि स्वच्छेनं आहे की नाही याची चौकशी करेल. अशी नोटीस दिली नसेल तर सदर धर्मांतर रद्द केले जाईल. अशा धर्मांतरातून लग्न होऊन नंतर लग्नविच्छेद झाल्यावर तो विवाहदेखील रद्द ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना असणार आहे. अशा पद्धतीच्या धर्मांतराबद्दल

असलेल्या तक्रारी केवळ रक्ताच्या नात्याकडून असलेल्या नातेवाईकांना अथवा पोलिसांना करता येतील. यासाठी विविध पातळ्यांवर दंडाची आणि कारावासाची तरतूद केली आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

अनेक वेळा धर्मांतराच्या मुद्द्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होते. प्रचलित कायद्यात याबाबत सुस्पष्ट तरतुदी नाहीत, त्यामुळे नव्या कायद्याची गरज आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. संविधानाच्या कलम २५ नुसार धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आहे, पण सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं आहे की प्रत्येकाला आपल्या धर्माचा अवलंब करायचा अधिकार असला तरी काही मर्यादा आहेत, असं त्यांनी नमूद केलं.

धर्मस्वातंत्र्य विधेयक हे संविधानाच्या विरोधात आहे अशी टीका अस्लम शेख यांनी केली. यामुळे दोन सज्ञान व्यक्तींना एकमेकांशी विवाह करायचा असेल आणि त्यांच्या कुटुंबियांनी तक्रार केली तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल अशी भीती शेख यांनी व्यक्त केली.

धर्मस्वातंत्र्य विधेयकानुसार ज्याच्यावर धर्मांतर घडवून आणल्याचा आरोप आहे त्यालाच निर्दोषत्व सिद्ध करावं लागणार आहे, ही अन्याय्य बाब असून यामुळे गैरवापर होईल, अशी भीती भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. याचा सरकारनं फेरविचार करावा अशी सूचना त्यांनी केली.

हे विधेयक एकतर्फी असून केवळ एका धर्माला लक्ष्य करण्यासाठी आहे असा आरोप समाजवादी पक्षाचे सदस्य रईस शेख यांनी यावेळी केला. ज्या अहवालाच्या आधारे हे विधेयक सादर केलं आहे तो अहवाल कुठं आहे, असा सवाल करत त्यांनी विधेयकाला विरोध केला.

<><><><><>

विनियोजन विधेयक २०२६ आज विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. त्याआधी अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभाग, ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास, सहकार, पणन, वस्त्रोद्योग, तसंच उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग या विभागांबाबत सदस्यांनी आज चर्चा केली. सदस्यांच्या मागण्यांवर संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी उत्तरं दिली. त्यानंतर मागण्या सभागृहात आवाजी मतदानानं मंजूर झाल्या.

<><><><><>

मुंबईप्रमाणेच राज्यातल्या सर्व खासगी रुग्णालयं आणि शुश्रुषागृहांचा आढावा घेण्यासाठी, आणि नोंदणी नसलेल्या अशा आस्थापनांवर कारवाई करण्यासाठी एक समिती स्थापना करण्याची घोषणा नगरविकास खात्याचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत केली.

सन २०३७ पर्यंत एसटी महामंडळाच्या ताफ्यातल्या सर्व बस इलेक्ट्रिक करायची योजना आखल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत दिली. सध्या महामंडळाकडे २२ हजार साध्या बस, तर ८००च्या आसपास इलेक्ट्रिक बस आहेत. २०३७पर्यंत टप्प्याटप्प्यानं या साध्या बसेसचं रूपांतर इलेक्ट्रीक बसमध्ये करायचा मानस असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

एलपीजीच्या काळाबाजार प्रकरणी विविध जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलेंडर जप्त केले असून, २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं.

उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेता एलपीजीला पर्याय म्हणून रॉकेल उपलब्ध करायचा विचार सरकार करत असून, याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला पत्राद्वारे कळवलं आहे, अशी माहितीही भुजबळ यांनी दिली. युद्धजन्य परिस्थितीमुळे खाद्यतेलाच्या दरात साधारण वाढ झाली आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

गॅस सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबवली जात आहे. तसंच, पीएनजी वापरण्याचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांसाठी काही कंपन्या विशेष सवलती देत आहेत, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली. देशातले सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने आणि सुरळीतपणे कार्यरत आहेत. देशात कुठेही इंधनसाठा संपल्याची तक्रार दाखल झालेली नाही. देशभरात ओटीपी आधारित सिलिंडर वितरणाचं प्रमाण ७२ टक्के इतकं झालं आहे, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

**- - - होल्ड... बाईट- सुजाता शर्मा - -**

**- <><><><><>**

ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यात काळाबाजार करून साठवलेले जवळपास सव्वादोन लाख रुपये किंमतीचे ८४ सिलेंडर पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी यंत्रणा प्रयत्न करत आहेत.

नांदेड जिल्ह्यात श्रीनगर भागातून १० सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडरची अवैध साठवणूक करून चढ्या दराने त्यांची विक्री केली जात होती. जिल्हा पुरवठा विभागाने छापे टाकून हे सिलिंडर जप्त केले.

अहिल्यानगर जिल्ह्यात कोपरगाव इथे संजीवनी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हची माहिती दिली.

**<><><><><>**

ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राला यंदाचा मराठी भाषेसाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाविस्कर हे सेवानिवृत्त कलाशिक्षक असून जळगाव जिल्ह्यात ते कार्यरत होते. काळ्या निळ्या रेषा या पुस्तकाची सुरुवात विदर्भ साहित्य संघाच्या युगवाणी या नियतकालिकातूनच झालेली आहे असं राजू बाविस्कर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**- होल्ड बाईट - राजू बाविस्कर - ३१ सेकंद - -**

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९३९ अंकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ५०३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २५८ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ४०९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय वाढ, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान अमरावती इथं ४० पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//